Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विशेष कक्ष
## परिपत्रक

**विषय:— विशेष कक्ष विभागाकडे नेट/सेट/पीएच.डी अर्हताधारक मागासवर्गीय उमेदवारांच्या नावनोंदणी बाबत. (सुधारित परिपत्रक)**
**संदर्भ:— जा.क्र.विशेष कक्ष/११७३/२०२५, दि.०९/१०/२०२५ रोजीचे परिपत्रक.**

शिक्षक पदांकरिता मागासवर्गीय घटकातील अर्हताधारक पात्र उमेदवार उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून विशेष कक्ष विभागाकडे नावनोंदणी योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. त्यानुसार विशेष कक्ष विभागाकडे सेट/नेट/पीएच.डी अर्हताधारक मागासवर्गीय उमेदवारांची नावनोंदणी करण्यात येते. संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था येथिल जाहिरात प्रक्रियेस अनुसरुन, सदर नावनोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांची यादी संबंधितांना पाठविण्यात येते. तेव्हा मागासवर्गीय उमेदवारांना सुलभ पध्दतीने नावनोंदणी करण्यात यावी, या उद्देशाने ऑनलाईन नावनोंदणीकरीता लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याबाबत संकेतस्थळावर दिलेली सूचना अवलोकनी घेऊन, खालील लिंकवर अर्हताप्राप्त उमेदवारांनी नावनोंदणी करावी. याबाबत काही तांत्रिक बाबी उद्‌भवल्यास विद्यापीठाच्या या ईमेल—वर support.cc@unishivaji.ac.in and spcell@unishivaji.ac.in संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| Page Link | :- | https://sukapps.unishivaji.ac.in/application-for-teacher-reservation-cell/#/login |

सदर योजना फक्त मागासवर्गीय उमेदवारांसाठी लागू आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर परिपत्रक सर्व संबंधित विदयार्थी व शिक्षक यांचे निदर्शनास आणावे.

कळावे,

आदेशावरुन,

उपकुलसचिव
विशेष कक्ष विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

जा.क्र.विशेष कक्ष/ 1184/2025
दि. 24 OCT 2025

प्रति,

१. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२. सर्व अधिविभाग प्रमुख/संचालक/समन्वयक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. उपकुलसचिव, संलग्नता टी—१, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४. उपकुलसचिव, संलग्नता टी—२, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.